**ठळक बातम्या**

- संसदेचं पावसाळी अधिवेशन संस्थगित, या अधिवेशनात लोकसभेत १२ तर राज्यसभेत १५ विधेयकं मंजूर

- परराष्ट्र मंत्री डॉ. एस जयशंकर यांची रशियाच्या परराष्ट्र मंत्र्यांशी चर्चा, संतुलित आणि शाश्वत पद्धतीनं द्विपक्षीय व्यापार वाढवण्यावर भर

- दिवाळी आणि छट पूजेसाठी १२ हजारापेक्षा जास्त विशेष गाड्या सोडण्याचा रेल्वेचा निर्णय

- उपराष्ट्रपती पदासाठी इंडिया आघाडीचे उमेदवार बी. सुदर्शन रेड्डी यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**आणि**

- आशियाई नेमबाजी स्पर्धेत १० मीटर एअर रायफलमधे भारताच्या अर्जुन बबुता, रुद्रांक्ष पाटील, किरण जाधव यांच्या संघानं पटकावलं सुवर्णपदक

**<><><><>**

संसदेचं पावसाळी अधिवेशन आज संस्थगित झालं. आज सकाळी ११ वाजता लोकसभेचं कामकाज सुरु झाल्यावर, बिहार मतदारयाद्या पुनरीक्षणावर चर्चा करण्याची मागणी विरोधी पक्षांनी केली. मात्र सभापती ओम बिर्ला यांनी प्रश्नोत्तराचा तास पुकारल्यामुळे गोंधळ सुरु झाला. त्यामुळे कामकाज १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. पुन्हा कामकाज सुरु झाल्यावरही गोंधळ सुरुच राहिल्यानं अखेर कामकाज पुढच्या अधिवेशनापर्यंत स्थगित करत असल्याचं सभापतींनी जाहीर केलं.

या अधिवेशनात लोकसभेत एकूण १४ विधेयकं सादर झाली, त्यातली १२ विधेयकं मंजूर करण्यात आली. २८ आणि २९ जुलै रोजी ऑपरेशन सिंदूरवर चर्चा झाली. त्याला प्रधानमंत्र्यांनी उत्तर दिलं. या अधिवेशनात लोकसभेमध्ये केवळ ३७ तास चर्चा झाल्याचं बिर्ला यांनी सांगितलं.

राज्यसभेत उपाध्यक्ष हरिवंश यांनी विरोधी सदस्यांनी दिलेले १८ स्थगन प्रस्ताव फेटाळले. त्यामुळे गोंधळ वाढला आणि राज्यसभेचं कामकाज २ वाजेपर्यंत तहकुब करण्यात

आलं. दुपारी २ वाजता राज्यसभेच्या कामकाजाला सुरुवात झाल्यानंतर ऑनलाईन गेमिंग विधेयक २०२५ राज्यसभेच्या मंजुरीकरता मांडण्यात आलं. यादरम्यान घटनादुुरुस्ती विधेयक २०२५, केंद्रशासित प्रदेश सुधारणा विधेयक २०२५ आणि जम्मू काश्मीर पुनर्स्थापना विधेयक २०२५ ही तीन विधेयकं संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठवण्यात आली. त्यानंतर राज्यसभेचं कामकाजही संस्थगित झालं. या अधिवेशनात राज्यसभेत १५ विधेयकं मंजूर झाल्याचं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितलं.

ऑनलाईन गेम्सबाबतच्या विधेयकाबद्दल काही नागरिकांनी आकाशवाणीशी बोलताना समाधान व्यक्त केलं. मुंबईतले ब्रह्मदेव अतकरी म्हणाले.....

**-- - होल्ड - बाईट- ब्रह्मदेव अतकरी - - -**

अहिल्या नगरचे ॲडव्होकेट आनंद सूर्यवंशी यांनी सांगितलं....

- **- -होल्ड - बाईट- आनंद सूर्यवंशी - -**

तर धुळ्याचे संतोष मासोळे म्हणाले...

- **- होल्ड- बाईट - संतोष मासोळे - -**

**<><><><>**

परराष्ट्र मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी आज रशियाचे परराष्ट्र मंत्री सर्गेई लावरोव्ह यांच्याशी भारत रशिया द्विपक्षीय संबंधाविषयी चर्चा केली. या चर्चेनंतर झालेल्या वार्ताहर परिषदेत दोन्ही मंत्र्यांनी संतुलित आणि शाश्वत पद्धतीनं द्विपक्षीय व्यापार वाढवण्यावर भर असल्याचं सांगितलं. यात भारताकडून होणाऱ्या निर्यातीचा समावेश असून निर्यातीतले अडथळे दूर करणं आवश्यक असल्याचं जयशंकर यावेळी म्हणाले. औषधनिर्मिती, कृषी आणि वस्त्रोद्योग अशा विविध क्षेत्रात भारताने रशियाला निर्यात केली तर सध्याचं असंतुलन दूर व्हायला मदत होईल, असं जयशंकर यावेळी म्हणाले. काझान आणि येकातेरिनबर्ग इथं दोन नवीन भारतीय वाणिज्य दूतावास उघडण्याचं काम जलदगतीने सुरू करण्याची गरजही जयशंकर यांनी व्यक्त केली.

**<><><><>**

दिवाळी आणि छट पूजेसाठी १२ हजारांपेक्षा जास्त विशेष गाड्या सोडण्याचा निर्णय भारतीय रेल्वेनं घेतला आहे. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज नवी दिल्ली इथं वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. १३ ते २६ ऑक्टोबर दरम्यान प्रवास सुरु करून, १७ नोव्हेंबर ते १ डिसेंबर दरम्यान परतीचा प्रवास करणाऱ्या प्रवाशांना परतीच्या तिकिटावर २० टक्के सूट दिली जाईल, असं त्यांनी यावेळी सांगितलं. सणासुदीच्या काळात हा उपक्रम राबवला जाणार असून, जनतेला मोठ्या संख्येनं त्याचा लाभ मिळेल, असं ते म्हणाले.

तसंच गया-दिल्ली, सहरसा-अमृतसर, छपरा-दिल्ली आणि मुझफ्फरपूर-हैदराबाद या चार मार्गांवर नवीन अमृत भारत एक्सप्रेस गाड्या सुरू केल्या जातील, अशी माहिती त्यांनी दिली. भगवान गौतम बुद्धांशी संबंधित महत्त्वाच्या स्थळांना जोडणारी एक नवीन सर्किट ट्रेन देखील सुरू केली जाईल, असं त्यांनी सांगितलं.

<><><>

इंडिया आघाडीचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार, सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्यायमूर्ती बी सुदर्शन रेड्डी यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी, राहुल गांधी, शरद पवार, रामगोपाल यादव यांच्यासह इतर नेते उपस्थित होते. उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी रेड्डी यांनी संसद भवन संकुलातील प्रेरणा स्थळावर जाऊन महात्मा गांधींच्या पुतळ्याला अभिवादन केलं.

राष्ट्रीय लोकशाही आघाडीकडून सी पी राधाकृष्णन यांनी याआधी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. अर्जांची छाननी उद्या होणार असून २५ ऑगस्टपर्यंत अर्ज मागे घेता येईल. ९ सप्टेंबरला उपराष्ट्रपती पदासाठी मतदान आणि मतमोजणी होईल.

या निवडणुकीसाठी निरीक्षक म्हणून पंचायत राज मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव सुशीलकुमार लोहानी, आणि वित्त मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव डी. आनंदन यांची नियुक्ती निवडणूक आयोगानं केली आहे.

<><><>

कझाकस्तानमध्ये सुरू असलेल्या आशियाई नेमबाजी स्पर्धेत आज भारताच्या अर्जुन बबुता, रुद्रांक्ष पाटील आणि किरण जाधव यांच्या संघाने १० मीटर एअर रायफल प्रकारात सुवर्णपदक जिंकलं आहे. या तिन्ही नेमबाजांनी एकूण १ हजार ८९२ गुण

पटकावले आणि चीनच्या संघाला मागे टाकत सुवर्णपदक पटकावलं. या स्पर्धेत महिला गटात मानसी रघुवंशीने सुवर्णपदक जिंकलं तर भारताच्याच यशस्वी राठोडने महिलांच्या कनिष्ठ गटात कांस्यपदक जिंकलं.

<><><>

जम्मू-काश्मीरमध्ये श्रीनगर इथल्या दाल सरोवरात आजपासून येत्या २३ ऑगस्ट पर्यंत तीन दिवसीय खेलो इंडिया जल क्रीडा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. जम्मू-काश्मीरची संस्कृती आणि नैसर्गिक सौंदर्याचा उत्सव म्हणून हा महोत्सव साजरा होत आहे. खेलो इंडिया जल क्रीडा महोत्सव शुभंकर हिमालयीन किंगफिशरपासून प्रेरित आहे.

या महोत्सवात एकूण ३६ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधले ५०० पेक्षा जास्त खेळाडू रोइंग, कॅनोइंग आणि कायाकिंग या क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होतील. यावेळी वॉटर स्कीइंग, ड्रॅगन बोट आणि शिकारा शर्यत यासारखे जल क्रीडा प्रकारही सादर होतील.

<><><>

अठराव्या आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र आणि खगोल भौतिकशास्त्र ऑलिम्पियाड स्पर्धेचा आज मुंबईत समारोप झाला. या स्पर्धेत सहभागी झालेल्या पाचही भारतीय स्पर्धकांनी पदकांची कमाई केली आहे. आरुष मिश्रा, अक्षत श्रीवास्तव, बनिब्रत माजी आणि पाणिनी यांनी सुवर्णपद जिंकलं, तर सुमंत गुप्ता यांनी रौप्यपदक पटकावलं.

<><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला. यावेळी दोन्ही नेत्यांनी युक्रेन आणि पश्चिम आशिया प्रदेशातील संघर्षांचे शांततापूर्ण निराकरण करण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांवर चर्चा केली. यावेळी शांतता आणि स्थिरता प्रस्थापित करण्यासाठी भारत नेहमी सहकार्य करेल असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी चर्चेत सांगितलं. त्याबरोबर त्यांनी व्यापार, संरक्षण, नागरी अणु सहकार्य, तंत्रज्ञान आणि ऊर्जा या क्षेत्रांसह द्विपक्षीय सहकार्य करारांमधील प्रगतीचाही आढावा घेतला.

<><><>

गोवा राज्य मंत्रिमंडळात आज दिगंबर कामत आणि रमेश तावडकर या दोन नव्या मंत्र्यांचा समावेश झाला. दिगंबर कामत हे गोव्याचे माजी मुख्यमंत्री आहेत, तर तावडकर

यांनी नुकताच विधानसभेच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. गोव्याचे राज्यपाल अशोक गजपती राजू यांनी दोन्ही मंत्र्यांना शपथ दिली.

**<><><><>**

भारताची पहिली मानवयुक्त अंतराळ मोहीम असलेल्या गगनयान ची पहिली चाचणी यंदाच्या डिसेंबर मध्ये होईल, अशी माहिती इस्रोचे अध्यक्ष व्ही. नारायणन यांनी आज दिली. ते आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत बोलत होते. गगनयान मोहिमेची प्रगती समाधानकारक आहे. तसंच यामध्ये आतापर्यंत सुमारे सात हजार ७०० चाचण्या घेण्यात आल्या असून, पुढल्या वर्षी मार्च महिन्यापर्यंत उर्वरित २ हजार ३०० चाचण्या घेतल्या जातील, असं ते यावेळी म्हणाले.

**//<><><><>//**